D O PSI उन्चित मॅडम
I/O Dy.S.P. पाटिल मॅडम

I/O प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** एम.आई.डी.सी. वाळूज

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0105 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/02/2024 01:42

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 07/02/2024
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 07/02/2024
**Time From (वेळेपासून):** 16:45 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 08/02/2024 **Time (वेळ):** 01:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/02/2024 01:07 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 7 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पवार फेब्रिकेशन समोर कमळापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा)**:**

(a) **Name** (नाव)**:** हबीबउल्ला अन्वरउल्ला शेख

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) **:**

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष)**:** 1960

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व)**:** भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.)**:**

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.)**:**

**Date of Issue** (दिल्याची तारीख)**:**
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण)**:**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता)**:**

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गट नं 55, प्लट नं 1 व 2, रांज,एम.आई.डी.सी. वाळूंज,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गट नं 55, प्लट नं 1 व 2, रांज,एम.आई.डी.सी. वाळूंज,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय)**:**

(j) **Phone number** (फोन नं.)**:**

**Mobile** (मोबाइल नं.)**:**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता)**:**

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | आलोसे श्री शैलेश जाधव | | | 1. रो-हाऊस नंबर 5, सहारा वंदावन,,एम.आई.डी.सी. वाळूंज,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | आसीफ कासम शेख | | | 1. श्री चांद पाशा यांच्या घरात, च, एम.आई.डी.सी. वाळूंज, औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | दशरथ जगन्नाथ वाघमारे | | | 1. भारत पिठाच्या गिरणी जवळ, पवन न,एम.आई.डी.सी. वाळूज, औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 07/02/2024

मी हबीबउल्ला अन्वरउल्ला शेख, वय 64 वर्षे, व्यवसाय शेती, लेबर कॉन्ट्राटर व अप्सरा इंड्रस्टीयल सर्व्हिस दुकान, रा. गट नं 55, प्लॉट नं 1 व 2, रांजणगांव ते वाळुज रोडवर, कमळापुर, ग्रुप ग्रामपंचायत जोगेश्वरी, जि.छत्रपती संभाजीनगर मो.क्र. 9923196263
समक्ष पोलीस स्टेशन MIDC वाळुज येथे हजर राहुन सांगतो की, " मी वरील ठिकाणी परिवारासह राहतो व माझी वडीलोपार्जीत शेती असुन आम्ही शेती करतो व वरील दुकान चालवितो.
आमच्या दुकानास माझा मुलगा नामे शेख एजाज शेख हबीब, व आमच्या घरास मुलगा नामे शेख खलील शेख हबीब यांचा नावाने विद्युत महावितरण कंपनी कडुन विद्युत मीटर बसविण्यात आलेले होते.
माझ्या मुलांचे नावे असलेले घराचे व दुकानाचे विद्युत मीटर ऑक्टोंबर 2023 मध्ये शॉर्ट सर्क्रीट होवुन खराब झाले होते. त्यावेळी आम्ही फोनकरुन विद्युत मीटर खराब झाले बाबत वाळुज येथे विद्युत महावितरण कार्यालयास तक्रार दिली होती. त्यावेळी विद्युत महावितरण कार्यालय वाळुज येथुन जाधव व दशरथ हे आमच्या दुकानात आले त्यांनी खराब दोन्ही विद्युत मीटरची पाहणी केली. फॅन, फ्रिज, टिव्ही इतर वस्तु चेक करुन माझी सही घेतली, त्यानंतर विद्युत लाईट डायरेक करुन सरासरी बील येईल असे म्हणाले तसेच आम्ही नवीन मिटर बसुन देऊ असे म्हणुन दोघेही निघुन गेले.
त्यानंतर नोव्हेंबर 2023 मध्ये विद्युत विभागाचे श्री जाधव व श्री दशरथ हे आमच्या दुकानावर आले त्यावेळी त्यांनी सांगीतले की, आमच्याकडे विद्युत मीटर उपलब्ध नाही. तुम्ही मार्केट मधुन दोन विद्युत मीटर खरेदी करुन आणुन द्या असे सांगीतल्यामुळे मी महावीर चौकातील L&T कंपनीचे असलेल्या दुकानातुन दोन नवीन विद्युत मीटर खरेदी करुन विद्युत महावितरण कार्यालय वाळुज येथे जमा केले.
त्यानंतर मी श्री जाधव यांना वारंवार फोन करुन नवीन विद्युत मिटर बसुन देण्यासाठी विनंती करीत होतो. दिनांक 20/01/2024 रोजी माझ्या दुकानावर श्री जाधव व श्री दशरथ आले आणि मला म्हणाले की, आम्ही आमच्या साहेबांशी बोललो आहे, तुमचे विद्युत शार्ट सर्किट मुळे जळालेले विद्युत मीटरच्या जागी तुम्ही आमच्या कार्यालयात जमा केलले नवीन विद्युत मीटर आम्ही बसवुन देतो, परंतु त्याकरीता आम्हाला पाच हजार रुपये द्यावे लागेल, तुमची पैश्याची व्यवस्था झाली की आम्हाला फोन करा असे म्हणुन ते दोघे तेथुन निघुन गेले.
त्यानंतर दिनांक 28/01/2024 रोजी श्री दशरथ हे माझ्या दुकानावर आले त्यावेळी नवीन विद्युत मीटर बसवुन देतो पाच हजार रुपये आहे का असे विचारले असता मी त्यांना विचारले की, पाच हजार रुपये ही काही सरकारी फि आहे का किंवा त्याची मला काही पावती मिळले का त्यावरुन दशरथ यांनी जाधव यांच्याशी फोनवरुन बोलुन मला सांगीतले की, ही कोणतेही शासकीय फि नाही तेव्हा मला कळले की, विद्युत महावितरण कार्यालय वाळुज येथील श्री

जाधव वायरमन व श्री दशरथ हे लाच म्हणुन पाच हजार रुपये मागत आहेत तेव्हा त्यांना नाईलाजास्तव माझ्याकडे दिनांक 07/02/2024 रोजी पैसे येणार आहे त्यावेळी तुम्ही नवीन विद्युत मीटर घेऊन येऊन बसवुन द्या, तेव्हा पैसे देतो असे म्हणाल्यावर ते माझ्या दुकानावरुन निघुन गेले.

आज दिनांक 07/02/2024 रोजी विद्युत महावितरण कार्यालय वाळुज येथील श्री जाधव वायरमन व श्री दशरथ हे माझ्या दुकानावर येणार आहे तेव्हा त्यांनी माझ्या दुकान व घरावर असलेले शॉर्ट सर्किट मुळे जळालेले विद्युत मीटर काढुन त्याजागी नवीन विद्युत मीटर बसवुन देण्याकरीता माझ्याकडे 5,000/- रुपये स्वत: किंवा इतरामार्फत लाचेची मागणी करुन स्विकारल्यानंतर त्यांना पकडुन त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, तसेच माझी व विद्युत महावितरण कार्यालय वाळुज येथील श्री जाधव व श्री दशरथ यांचे सोबत कोणतीही वैर-दुश्मनी नाही तसेच उसनवारीचा अगर देण्या-घेण्याचा व्यवहार नाही.हि विनंती." सदर तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडम यांनी दोन्ही शासकीय पंचांची व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. त्यानंतर मी दिलेली तक्रार उपस्थितीत असलेले शासकीय पंचाना वाचावयास दिली पंचानी ती तक्रार वाचल्यानंतर त्यावर पंचानी सहया केल्या व पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडमने यांनी सदर तक्रारीवर समक्ष म्हणुन सही केली.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडमने यांनी सांगीतले की, आपणास तुमच्या तक्रारीवरुन श्री जाधव वायरमन व श्री दशरथ यांची लाचमागणी पडताळणी करणे असुन ते दोघेही तक्रारदार यांचे घराच्या खाली असलेले अप्सरा इंड्रस्टीयल सर्व्हिस दुकानात भेटण्यासाठी येणार असल्याने सदर ठिकाणी जाऊन लाचेची पडताळणी करण्याचा निर्णय पोउपअधी पाटील मॅडम यांनी पंच व माझ्या संमतीने घेतला व सदर लाचमागणी पडताळणी करीता नवीन मेमरी कार्ड व डिजीटल व्हाईस रेकॉर्डर वापरण्यात येणार असल्याचे सांगीतले.

त्यानंतर आम्ही सर्वजण ऍ्न्टी करप्शन कार्यालयातुन निघुन कमळापुर येथील माझ्या राहत्या घर व दुकानाच्याजवळ जाऊन सुरक्षित ठिकाणी थांबलो. त्यावेळी मी माझे मोबाईल फोनवरुन वायरमन श्री.जाधव यांना फोन करुन ते माझे घराकडे कधी येणार आहेत याबाबत विचारले असता जाधव म्हणाले की आम्ही थोडया वेळात तुमच्या दुकाणावर येत आहोत. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडम यांच्या सुचनेवरुन मी आणि पंच क्रमांक 1 श्री सुरज सुर्यवंशी असे आमच्या दुकानात थांबु राहीलो. दुकानात थांबण्यापुर्वी सापळा पथकातील श्री चव्हाण यांनी डिजीटल व्हाईसरेकॉर्डरचे प्रात्यक्षिक करुन दाखवुन त्यामध्ये एक नवीन मेमरी कार्ड टाकले. सदरचे डिजीटल व्हाईसरेकॉर्डर चालु करुन माझ्या अंगावर असलेल्या शर्टच्या आतील बाजुस कोणास दिसणार नाही अशारितीने व्यवस्थित ठेवले. त्यानंतर मी व पंच श्री सुरज असे पायी पायी माझ्या दुकानात येऊन बसलो. काहीवेळाने माझ्या दुकानासमोर एका दुचाकी वाहनाव श्री जाधव वायरमन व त्यांच्या सोबत हेल्पर आसीफ आले. त्यानंतर तेथे माझी, व श्री जाधव वायरमन, हेल्पर आसीफ यांच्यात आमच्या घरावर व दुकानावर नवीन विद्युत मीटर बसवुन देण्याबाबत चर्चा सुरु झाली तेव्हा वायरमन जाधव यांचे सांगणे वरुन श्री आसीफ यांनी त्यांचे मोबाईल वरुन श्री दशरथ यांना फोन लावला व म्हणाले की, साहेब ते मामु , आपलं दशरथ ते मामु शी बोलुण घे ना, हा... घे, हे घ्या त्यावर मी म्हणालो की, बोलाना किती सांगीतले काय ते विचारा ना, त्यावर श्री जाधव फोन बोलले की, हॅलो, त्या, मी बोलतो म्हणलं, ते ते मामु ला बोलुण घे काय हे ते, हा ये मोबाईल माझ्या समोरच हे ते, बोलुण घे. त्यानंतर श्री जाधव यांनी मोबाईल फोन माझ्याजवळ दिला तेव्हा मी मोबाईल फोनवर म्हणलो की, हॅलो, ऑ... ऑ... त्यावर श्री दशरथ म्हणाले की, चार बजे लाके मिटर बिठा दिंगे, त्यावर मी म्हणालो की, हा. त्यावर श्री दशरथ म्हणाले की, तभी आसिफ के पास पैसे देदो सर, त्यावर मी म्हणालो की, कित्ते ? त्यावर श्री दशरथ म्हणाले की, पाच हजार रुपये दे दो. त्यावर मी म्हणालो की, दोनो मिटर के क्या, त्यावर श्री दशरथ म्हणाले की,हा दोनो मिटर ला के बिठा देंगे, असे बोलणे झाल्यावर श्री जाधव वायरमन व हेल्पर आसीफ हे दुकाना समोरुन निघुन गेले. त्यानंतर मी, पंच श्री सुरज असे पायी पायी सापळा पथक थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी परत आलो.

वरील सर्व हकीगत पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडमने यांना सांगीतली. त्यावरुन श्री जाधव वायरमन यांच्या समक्ष हेल्पर आसीफ व श्री दशरथ यांच्याफोनवरुन झालेल्या संभाषणात नवीन विद्युत मीटर बसवुन देण्याकरीता माझ्याकडे 5000/- रुपये पंचा समक्ष लाचेची मागणी करुन हेल्पर आसिफ यांचे हस्ते लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले आहे.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडमने मला, सापळा पथक व पंचाना सापळा कारवाई बाबत थोडक्यात माहीती दिली व श्री जाधव वायरमन अथवा हेल्पर आसीफ याने लाच स्वीकरल्यानंतरचा नियोजीत ईशारा करण्यास सांगीतले. मी 5,000/- रुपये उपलब्ध करुन पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडम यांच्यासमोर हजर केले. त्यावरुन सदरची 5000/- रुपये रक्कम उपलब्ध झाल्याने लाचेची रक्कम म्हणुन देण्याचा निर्णय सर्वनुमते घेण्यात आला.

मी आणलेले 5000/- रुपये नोटांना ऍन्थ्रॅसीन पावडर लावून लाचेची रक्कम माझे पॅन्टचे उजव्या बाजुच्या खिशात ठेवली व व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझ्याजवळ दिला. त्यानंतर मी व पंच सुरज असे सुरक्षित ठिकाणाहुन पायी पायी आमच्या दुकानात येऊन थांबलो.

काही मिनीटाने माझ्या दुकानात श्री जाधव वायरमन, हेल्पर आसीफ असे आले, तेव्हा श्री जाधव वायरमन यांनी नवीन मीटर आसीफ कडे दिले व निघुन गेले. त्यानंतर श्री आसीफ यांनी नवीन मीटर बसविले काही वेळाने आसीफ माझ्याजवळ आला तेव्हा मी त्यास श्री जाधव वायरमन यांना फोन लावण्यास सांगीतले असता श्री आसीफ याने जाधव वायरमन यास फोन लावला व त्यावर आसीफ जाधवयांना म्हणाला की, मिटर बसवले म्हणलं दोघं बी त्यावर जाधव हे ठिक आहे असे म्हणाले त्यावर असीफ म्हणाला की, हा मामाशी बोलुन घ्या तेव्हा मी आसीफ यांचा फोन माझ्याकडे घेऊन जाधव यांना म्हणालो की, जाधव साहेब, हयांच्याकडे देऊ का पाच हजार रुपये ते, त्यावर श्री जाधव म्हणाले की, देऊन टाका, त्यावर मी म्हणालो की, नई तर परत तुम्ही नाराज होतान बर का त्यावर श्री जाधव म्हणाले की, नई नई नई नई त्यावर मी म्हणालो देतो यांच्याकड बरका पाच हजार त्यावर श्री जाधव म्हणाले की, हो हो, त्यावर मी म्हणालो की ठिक हे असे मी माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशातुन उजव्या हाताने 5000/- रुपये लाचेची रक्कम काढुन पंचासमक्ष श्री आसीफ यांच्यासमोर धरले असता श्री आसीफ याने त्याच्या उजव्या हाताने लाचेची 5,000/- रुपये रक्कम स्विकारुन दोन्ही हाताने मोजुन अंगात परिधान केलेल्या टी शर्टच्या समोरील खिशात ठेवले तेव्हा मी सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला, ती वेळ 16.45 अशी होती. त्यावर लागलीच सापळा पथकातील अधिकारी, कर्मचारी, पंच क्र 2 असे सदर घटनास्थळी आले.

त्यानंतर सापळा पथकाने श्री आसीफ यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडमने यांचे सुचनेवरुन पंच क्रमांक 2 यांनी आरोपी श्री आसीफ यांनी परिधान केलेल्या टि शर्टवरील समोरी डाव्या खिशातुन ठेवलेली लाचेची रक्कम 5,000/- रुपये हस्तगत केली. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडमने स्वत:चा परिचय देवुन त्यांचे संपुर्ण नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव आसीफ कासम शेख वय 22 वर्ष पद-बाहय स्त्रोत कर्मचारी (कंत्राटी), म.रा.वि.मं.शाखा वाळुज, छत्रपती संभाजीनगर रा. श्री चांद पाशा यांच्या घरात, चांदणी चौक, जोगेश्वरी, MIDC वाळुज छत्रपती संभाजीनगर असे सांगीतले.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडम यांनी श्री आसीफ यांना वायरमन श्री जाधव यांच्याबाबत विचारणा केली असता वायरमन श्री जाधव हे तीसगांव चौकाकडुन कोल्हाटी वडगांवकडे जाणा-या रस्त्यावर असलेल्या सिडको गार्डन येथे येणार असे सांगीतले. पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडम यांच्या सुचनेवर सर्वजण सदर ठिकाणी तात्काळ निघालो व सिडको गार्डन जाऊन थांबलो असता, काही मिनीटात वायरमन श्री जाधव हे सदर ठिकाणी आल्याचे मी लगेच सापळा पथकास कळविले. त्यानुसार सापळा पथकाने वायरमन श्री जाधव यांना ताब्यात घेतले. तेव्हा पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडमने स्वत:चा परिचय देवुन त्यांचे संपुर्ण नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव शैलेश उत्तमराव जाधव वय 38 वर्ष पद-वरिष्ठ तंत्रज्ञ, म.रा.वि. वि.म. शाखा वाळुज, छत्रपती संभाजीनगर, रा.रो-हाऊस नंबर 5, सहारा वृंदावन, सिडको-1, वाळुज महामार्ग, छत्रपती संभाजीनगर असे सांगीतले. त्यानंतर सापळा पथक, दोन्ही पंच, मी व आरोपी लोकसेवक श्री जाधव व आरोपी श्री आसीफ असे तिथुन निघुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,छत्रपती संभाजीनगर येथे आलो. त्यानंतर काहीवेळाने आरोपी खाजगी इसम श्री दशरथ जगन्नाथ वाघमारे हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात हजर आले. तेव्हा पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडम

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
SWATI NARAYANRAO UCHIT
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): PSI
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

स्वाती उचित राऊत
पोलीस उपनिरीक्षक
पोलीस ठाणे MIDC वाळुज

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): AVINASH LAXMINAR.
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

वरील सर्व हकीगत पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडमने यांना सांगीतली. त्यावरुन श्री जाधव वायरमन यांच्या समक्ष हेल्पर आसीफ व श्री दशरथ यांच्याफोनवरुन झालेल्या संभाषणात नवीन विद्युत मीटर बसवुन देण्याकरीता माझ्याकडे 5000/- रुपये पंचा समक्ष लाचेची मागणी करुन हेल्पर आसिफ यांचे हस्ते लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले आहे.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडमने मला, सापळा पथक व पंचाना सापळा कारवाई बाबत थोडक्यात माहीती दिली व श्री जाधव वायरमन अथवा हेल्पर आसीफ याने लाच स्वीकरल्यानंतरचा नियोजीत ईशारा करण्यास सांगीतले. मी 5,000/- रुपये उपलब्ध करुन पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडम यांच्यासमोर हजर केले. त्यावरुन सदरची 5000/- रुपये रक्कम उपलब्ध झाल्याने लाचेची रक्कम म्हणुन देण्याचा निर्णय सर्वनुमते घेण्यात आला.

मी आणलेले 5000/- रुपये नोटांना ऍन्थ्रॅसीन पावडर लावून लाचेची रक्कम माझे पॅन्टचे उजव्या बाजुच्या खिशात ठेवली व व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझ्याजवळ दिला. त्यानंतर मी व पंच सुरज असे सुरक्षित ठिकाणाहुन पायी पायी आमच्या दुकानात येऊन थांबलो.

काही मिनीटाने माझ्या दुकानात श्री जाधव वायरमन, हेल्पर आसीफ असे आले, तेव्हा श्री जाधव वायरमन यांनी नवीन मीटर आसीफ कडे दिले व निघुन गेले. त्यानंतर श्री आसीफ यांनी नवीन मीटर बसविले काही वेळाने आसीफ माझ्याजवळ आला तेव्हा मी त्यास श्री जाधव वायरमन यांना फोन लावण्यास सांगीतले असता श्री आसीफ याने जाधव वायरमन यास फोन लावला व त्यावर आसीफ जाधवयांना म्हणाला की, **मिटर बसवले म्हणलं दोघं बी** त्यावर जाधव हे **ठिक आहे** असे म्हणाले त्यावर असीफ म्हणाला की, **हा मामाशी बोलुन घ्या** तेव्हा मी आसीफ यांचा फोन माझ्याकडे घेऊन जाधव यांना म्हणालो की, **जाधव साहेब, हयांच्याकडे देऊ का पाच हजार रुपये ते,** त्यावर श्री जाधव म्हणाले की, **देऊन टाका,** त्यावर मी म्हणालो की, **नई तर परत तुम्ही नाराज होतान बर का** त्यावर श्री जाधव म्हणाले की, **नई नई नई नई** त्यावर मी म्हणालो देतो **यांच्याकड बरका पाच हजार** त्यावर श्री जाधव म्हणाले की, **हो हो,** त्यावर मी म्हणालो की **ठिक हे** असे मी माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशातुन उजव्या हाताने 5000/- रुपये लाचेची रक्कम काढुन पंचासमक्ष श्री आसीफ यांच्यासमोर धरले असता श्री आसीफ याने त्याच्या उजव्या हाताने लाचेची 5,000/- रुपये रक्कम स्विकारुन दोन्ही हाताने मोजुन अंगात परिधान केलेल्या टी शर्टच्या समोरील खिशात ठेवले तेव्हा मी सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला, **ती वेळ 16.45** अशी होती. त्यावर लागलीच सापळा पथकातील अधिकारी, कर्मचारी, पंच क्र 2 असे सदर घटनास्थळी आले.

त्यानंतर सापळा पथकाने श्री आसीफ यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडमने यांचे सुचनेवरुन पंच क्रमांक 2 यांनी आरोपी श्री आसीफ यांनी परिधान केलेल्या टि शर्टवरील समोरी डाव्या खिशातुन ठेवलेली लाचेची रक्कम 5,000/- रुपये हस्तगत केली. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडमने स्वत:चा परिचय देवुन त्यांचे संपुर्ण नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव आसीफ कासम शेख वय 22 वर्ष पद-बाहय स्त्रोत कर्मचारी (कंत्राटी), म.रा.वि.मं.शाखा वाळुज, छत्रपती संभाजीनगर रा. श्री चांद पाशा यांच्या घरात, चांदणी चौक, जोगेश्वरी, MIDC वाळुज छत्रपती संभाजीनगर असे सांगीतले.

त्यानंतर पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडम यांनी श्री आसीफ यांना वायरमन श्री जाधव यांच्याबाबत विचारणा केली असता वायरमन श्री जाधव हे तीसगांव चौकाकडुन कोल्हाटी वडगांवकडे जाणा-या रस्त्यावर असलेल्या सिडको गार्डन येथे येणार असे सांगीतले. पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडम यांच्या सुचनेवर सर्वजण सदर ठिकाणी तात्काळ निघालो व सिडको गार्डन जाऊन थांबलो असता, काही मिनीटात वायरमन श्री जाधव हे सदर ठिकाणी आल्याचे मी लगेच सापळा पथकास कळविले. त्यानुसार सापळा पथकाने वायरमन श्री जाधव यांना ताब्यात घेतले. तेव्हा पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडमने स्वत:चा परिचय देवुन त्यांचे संपुर्ण नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव शैलेश उत्तमराव जाधव वय 38 वर्ष पद-वरिष्ठ तंत्रज्ञ, म.रा.वि.वि.म. शाखा वाळुज, छत्रपती संभाजीनगर, रा.रो-हाऊस नंबर 5, सहारा वृंदावन, सिडको-1, वाळुज महामार्ग, छत्रपती संभाजीनगर असे सांगीतले. त्यानंतर सापळा पथक, दोन्ही पंच, मी व आरोपी लोकसेवक श्री जाधव व आरोपी श्री आसीफ असे निघुन निघुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,छत्रपती संभाजीनगर येथे आलो. त्यानंतर काहीवेळाने आरोपी खाजगी इसम श्री दशरथ जगन्नाथ वाघमारे हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात हजर आले. तेव्हा पोलीस उप अधिक्षक श्रीमती संगीता पाटील मॅडमने स्वत:चा परिचय देवुन त्यांचे संपुर्ण नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव आरोपी खाजगी इसम श्री दशरथ जगन्नाथ वाघमारे वय 29 वर्ष रा. भारत पिठाच्या गिरणी जवळ, पवन नगर, सावता नगर रांजणगांव, MIDC वाळुज, छत्रपती संभाजीनगर असे सांगीतले. त्यावेळी सदर सर्व घटनेबाबत सविस्तर पंचनामे करण्यात आले आहे.

करीता दिनांक 07/02/2024 रोजी 1) आलोसे श्री शैलेश जाधव पद- वरिष्ठ तंत्रज्ञ, 2) इलोसे श्री आसीफ कासम शेख, बाहय स्त्रोत कर्मचारी, (कंत्राटी) 3) आरोपी खाजगी इसम श्री दशरथ जगन्नाथ वाघमारे यांनी पंचासमक्ष माझ्या दुकान व घरावर असलेले शॉर्ट सर्किट मुळे जळालेले विद्युत मीटर काढुन त्याजागी मी स्व:खर्चाने उपलब्ध करुन दिलेले नवीन विद्युत मीटर बसवुन देण्याकरीता माझ्याकडे 5,000/- रुपये लाचेची मागणी करुन 5,000/- हजार रुपये लाचेची रक्कम वाजता 16.45 वा. आसीफ कासम शेख यांचे मार्फतीने कमळापुर येथील पवार फॅब्रीकेशन समोर रोडवर स्वीकारली म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टंकलीखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली बरोबर व खरी आहे

समक्ष

(संगीता पाटील)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.

हि फिर्याद दिली